


परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 258 | बुधवार दि. 08 ऑक्टोबर 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी 31 हजार 628 कोटींचं पॅकेज जाहीर

**राज्य सरकारने केली मोठी घोषणा**



शेतकऱ्यांचे आपल्या पिकावर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम असते. अशा स्थितीत पीक करपून गेले, पाण्याखाली गेले, जमीन खरडून गेल्याने पुन्हा पेरणीची स्थितीही उरली नाही. आर्थिक आणि मानसिक त्रास शेतकऱ्यांना झाला. त्याची शंभर टक्के भरपाई कुणीच देऊ शकत नाही परंतु शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे यासाठी पॅकेज तयार केले आहे. 68 लाख 69 हजार हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले. 29 जिल्हे आणि 253 तालुके सरसकट मदतीच्या पॅकेजमध्ये घेतले आहेत. जिथे पिकांचे नुकसान झाले तिथे अटी शिथिल करून मदत केली जाणार आहे. राज्य सरकारने पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी 31 हजार 628 कोटींची मदत जाहीर केली आहे. या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, घरांची पडझड झाली, तिथे घरे उभारली जातील, 50 हजार रुपयांची मदत दुकानदारांना करणार आहेत. दुधाळ जनावरांसाठी 37 हजार 500 रुपये मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. 3 जनावरांची अट रद्द केली आहे. जेवढी जनावरे दगावली तेवढी मदत दिली जाईल. खरडून गेलेली जी जमीन आहे तिथे 47 हजार हेक्टरी रोख आणि 3 लाख रुपये हेक्टरी नरेगाच्या माध्यमातून देणार आहोत. ज्या विहिरींमध्ये गाळ गेलाय, नुकसान झाले आहे तिथे विशेष बाब म्हणून 30 हजार रुपये प्रति विहीर भरपाई दिले जाणार आहे. पायाभूत सुविधांचे जिथे नुकसान झाले तिथे 10 हजार कोटी मदत केली जाणार आहे असं त्यांनी सांगितले. तसेच 6175 कोटी रुपये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणार आहोत. बियाणे आणि इतर कामांसाठी प्रति हेक्टर 10 हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जाईल. कोरडवाहू शेतकऱ्यांना 18 हजार 500 रुपये हेक्टरी, पान 3 वर

## अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईचे मोठे पॅकेज ; ना. पंकजाताई मुंडेंनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार


**राज्य सरकारने शेतकऱ्यांचे अश्रू पुसत दिवाळीच्या तोंडावर निर्माण केला गोडवा!**



मुंबई।दिनांक 07।अतिवृष्टीमुळे राज्यात नुकत्याच झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी 31 हजार 628 कोटीचे आतापर्यंतचे सर्वात मोठे मदतीचे पॅकेज जाहीर केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उप मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात आलेले अश्रू पुसून दिवाळीच्या तोंडावर सरकारने गोडवा निर्माण केला आहे असं त्यांनी म्हटलं आहे.

राज्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचं आणि शेतकऱ्यांच्या घरांचं, शेती पिकांच मोठया प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी जमीन खरडून गेली पान 3 वर

## आज ठळक
## प्रभाग रचनेच्या आरक्षणाबाबत सुप्रीम कोर्टाचे 'जैसे थे'चे आदेश




आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेतील आरक्षणाबाबतचे नियम राज्य शासनाने बदलले आहेत. याविरोधात दाखल विविध याचिका फेटाळून लावत सुप्रीम कोर्टानं बारा दिवसांपूर्वीच (25 सप्टेंबर 2025) शासनाच्या नियमात हस्तक्षेपास नकार दिला होता. यानंतर आज (7 ऑक्टोबर) यासंदर्भात सुधारित आदेश सुप्रीम कोर्टानं दिला आहे. यामध्ये केवळ मध्य प्रदेशचा उल्लेख असलेला एकच बदल करण्यात आला असून जुन्या आदेशातील महाराष्ट्राच्या संदर्भातील आदेश कायम ठेवण्यात आला आहे.25 सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टानं निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेपास नकार दिला होता. प्रभाग रचनेसाठी एसएसी, एसटी आणि ओबीसींसाठी चक्रानुक्रमानं आरक्षण दिलं जातं. तर ओबीसींना लॉट्सचे ड्रॉ काढून आरक्षण दिलं जातं. याबाबत राज्यघटनेतील कलम 243 डी नुसार चक्रानुक्रमानं अर्थात आळीपाळीनं प्रभाग आरक्षित व्हावेत अशी तरतूद आहे. यामध्ये एससी आणि एसटीचे आरक्षित प्रभाग पहिल्या निवडणुकीत निश्चित होतात. त्यानंतर पुढच्या निवडणुकीत पुढचे प्रभाग निश्चित होतात, अशा प्रकारे संपूर्ण प्रभाग पूर्ण होईपर्यंत हे आरक्षण चक्राकार पद्धतीनं फिरवलं जात असतं. त्याचप्रमाणे एसटी प्रवर्गाचंही आरक्षण फिरवलं जातं, तसंच ओबीसींचं देखील चक्राकार पद्धतीनं फिरवलं जातं. दरम्यान, यासंदर्भात 1996 मध्ये या पद्धतीचे नियम आले. त्यानंतर 1997च्या निवडणुकीत पहिल्यांदा हे चक्राकार आरक्षण सुरु झालं, त्यानंतर 2002, 2007, 2012, 2017 अशा पाच निवडणुकांमध्ये ही आरक्षणाची चक्राकार पद्धत पूर्ण झाली. दरम्यान, प्रशांत बंब विरुद्ध महाराष्ट्र शासन आणि उदय खंडेराव पवार विरुद्ध महाराष्ट्र शासन या दोन खटल्यांमध्ये हायकोर्टानं आदेश दिले होते की, हा चक्रानुक्रम प्रभागांमधील लोकसंख्येचं प्रमाण किंवा गुणोत्तर जरी बदललं तरी या चक्राकार नियमाचं पालन करावंच लागेल. त्यानुसार राज्य निवडणूक आयोग याचं पालन करत होतं.

पण यंदा राज्य शासनानं पान 3 वर




## ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून ओंकार ग्रुपची मुख्यमंत्री सहाय्यता निधीला एक कोटीची मदत

**» मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला धनादेश**



मुंबई ।दिनांक 07। राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतातील पिकांचे तसेच शेतीसंबंधित साधनसामग्रीचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आणि सामाजिक बांधिलकी जपत ओंकार ग्रुपने राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्ये माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला एक कोटी रुपयांची मदत दिली. ना. पंकजाताई मुंडे व ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी मदतीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आज सुपूर्द केला. पान 3 वर

## सरन्यायाधीशांवर हल्ला करणारा RSS चा कार्यकर्ता, रोहित पवारांकडून मोठा गौप्यस्फोट



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका वकिलाने बूट फेकून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या घटनेच्या निषेधार्थ आज विरोधकांकडून एल्गार पुकारण्यात आला आहे. या घटनेचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. त्यासोबतच मुंबई काँग्रेससह इतर राजकीय पक्षांनी राज्यभरात या घटनेच्या निषेधार्थ विविध ठिकाणी आंदोलने करण्यात येत आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे रोहित पवारांच्या नेतृत्वात निदर्शने करण्यात आली. तर दुसरीकडे बारामतीत खासदार सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार पान 3 वर

## हायकोर्टाचा मराठा समाजाला मोठा दिलासा; 'त्या' GR च्या स्थगितीस नकार




मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील उपोषणानंतर महायुती सरकारनं मराठा आरक्षणासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेताना हैदराबाद गॅझेट लागू करण्याचे निर्देश दिले होते. सरकारच्या 2 सप्टेंबर 2025 रोजीच्या याच अध्यादेशाला मुंबई हायकोर्टानं सरकारच्या हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या अध्यादेशाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. मुंबई हायकोर्टानं दिलेला हा निर्णय मराठा पान 3 वर

## कै.राजपान कराड यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमीत्त

**लिंबोटा येथे गुरुवारी ह.भ.प.केशव महाराज घुले यांचे किर्तन**



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) परळी तालुक्यातील मौजे लिबोटा येथिल भगवान सेनेचे सरसेनापती तथा जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांचे चिरंजीव कै.राजपान कराड यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमीत्त परळी तालुक्यातील मौजे लिंबोटा येथे गुरुवार दि.9 ऑक्टोबर रोजी ह.भ.प.केशव महाराज घुले यांचे किर्तन व भोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांचे चिरंजीव राजपान यांचे दोन वर्षापुर्वी दुःखद निधन झाले होते.राजपान यांचे दि.9 ऑक्टोबर रोजी द्वितीय पुण्यस्मरण असुन यानिमित्त लिंबोटा येथील हनुमान मंदिरात पान 3 वर

## मराठवाडा साथीचे संपादक सतीश बियाणी यांना परळीकरांच्या वतीने भावपूर्ण अभिवादन

**अभिवादन सभेत अनेकांनी व्यक्त केल्या आपल्या भावना**



परळी/ प्रतिनिधी-

दैनिक मराठवाडा साथीचे संपादक सतीश शेठ बियाणी यांचे दिनांक 12 सप्टेंबर रोजी निधन झाले होते. त्यांना अभिवादन करण्यासाठी परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात परळीकरांनी श्रद्धांजली अर्पण केली.तसेच यावेळी उपस्थित मान्यवरासह अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे आज मंगळवार दिनांक 7 ऑक्टोबर रोजी दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक स्मृतीशेष सतीश शेठ बियाणी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाच्या परळी शहराध्यक्ष उमाताई समशेट्टे, नगरसेवक प्रा. पवन मुंडे, शरद पवार राष्ट्रवादी गटाचे नेते एडवोकेट जीवनराव देशमुख, सुरज बियाणी,सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, दैनिक परळी प्रहार चे संपादक राजेश साबणे, ओमप्रकाश बियाणी, अनिल बियाणी आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष स्थानावरुन बोलताना रानबा गायकवाड म्हणाले की, दैनिक मराठवाडा साथीने परळी शहरातील अनेक आंदोलनाला पाठबळ दिले. तसेच अनेक कार्यकर्ते आणि नेते तसेच साहित्यिक घडविण्यात दैनिक मराठवाडा साथीचा सिंहाचा वाटा आहे. सतीश पान 3 वर

## अंबाजोगाई नगरपरिषद अध्यक्षपदासाठी अक्षय मुंदडा प्रबळ दावेदार!

**"मी येतोय आपल्या सेवेत" -अक्षय मुंदडा**



प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठीची निवडणूक आता अत्यंत रंगतदार होणार आहे. 9 वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर होणाऱ्या या निवडणुकीसाठी इच्छुकांनी जोरदार तयारी सुरु केली असतानाच, सोमवारी, दि. 06 ऑक्टोबर रोजी नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या आरक्षण सोडतीत अध्यक्षपद अखेर खुल्या प्रवर्गासाठी (General Category) आरक्षित झाले. ओबीसी आरक्षणाची चर्चा असताना अचानक खुल्या प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाल्याने अनेकांना धक्का बसला, मात्र निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे.

प्रमुख लढत आणि दावेदार अध्यक्षपद खुल्या प्रवर्गासाठी जाहीर झाल्यामुळे अनेक नवे चेहरे आणि पान 3 वर

## मनुवादी वकील राकेश किशोरवर देशद्रोहाचा खटला चालवा



वडवणी प्रतिनिधी भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई साहेबांवरील हल्ल्याचा किंचितही पश्चाताप नाही. दैवी शक्तीनेच मला हे करण्यास भाग पाडले अशा निर्लज्ज शब्दांमध्ये तो प्रतिक्रिया देतो अद्यापही त्याची भाषा मग्रुरीचीच असून याचा अर्थ मनुवादी विचारांनी त्याचा मेंदू सडल्याचं दिसतंय. लोकशाहीत राहून लोकशाहीवर उलटणाऱ्या पान 3 वर

# पुरोगामी चळवळीचा निष्ठावंत शिलेदार: विकास वाघमारे



युवा पत्रकार, सशक्त अभिनेता, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा सजग पदाधिकारी आणि उत्तम माणूस म्हणून ओळखले जाणारे विकास वाघमारे हे सामाजिक भान ठेवून अविरत कार्यरत असलेले एक सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व आहे. 'आपण समाजाचे देणं लागतो' या आत्मिक भावनेतून ते सतत विधायक कृती करताना दिसतात. त्यांच्यातील उमेदेपणा, उत्साह, आणि नाविन्याची ओढ त्यांना नेहमीच समाजासाठी सकारात्मक व परिणामकारक उपक्रम राबवण्यास प्रवृत्त करते.

बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची सामाजिक-सांस्कृतिक बांधिलकी:-

विकास वाघमारे यांच्या कार्याची व्याप्ती एकाच क्षेत्रापुरती मर्यादित नसून ती बहुआयामी आहे. पत्रकारिता, अभिनय आणि लेखणी यांसारख्या माध्यमांसोबतच ते प्रत्यक्ष सामाजिक उपक्रमांतही सक्रिय सहभागी असतात. रक्तदान शिबिर आयोजन, वृक्षारोपण आणि जनजागृतीपर सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून ते समाजासाठी सतत काहीतरी करत असतात.

कला आणि सांस्कृतिक प्रबोधन या लढाईतही त्यांचा महत्त्वाचा आणि निष्ठावान सहभाग आहे. नाटककार साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड आणि प्रख्यात सिने-नाट्य अभिनेता, लेखक-दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे यांच्या समवेत ते एक निष्ठावंत कलावंत म्हणून सक्रिय आहेत. त्यांनी 'भीमयुग', 'फोटोसेशन', 'झुकती है दुनिया', आणि 'झेडपीचे सर अन कामं ढीगभर' या नाटकांमध्ये उत्तम भूमिका साकारल्या आहेत. तसेच, 'माईंड ईट', 'पाण्याखालचं पाणी', 'राधा', आणि 'फायनल तिकीट' या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या लघुचित्रपटांत त्यांनी विविध भूमिका साकारुन आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे. विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त सिने-नाट्य लेखक-दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे दिग्दर्शित 'द थर्ड आय' या आगामी सिनेमात ते लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार आहेत.

दिग्दर्शक महिंद्र महाडिक यांच्या लेखणीतून साकारलेल्या 'शिवपुत्र संभाजी' या भव्य महानाट्यात, अभिनेते डॉ. खा. अमोल कोल्हे यांची प्रमुख भूमिका आहे. या महानाट्याच्या कथानकात असणाऱ्या शाहिरी फडाच्या दृश्यांमध्ये विकास वाघमारे हे शाहीर भूषण गाडे यांच्यासोबत आपली महत्त्वपूर्ण भूमिका साकारतात.

विख्यात लेखक राजन खान यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या अक्षर मानव एकांकिका विभागाचे परळी वैजनाथ तालुका सचिव म्हणून ते कार्यरत आहेत. तसेच अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अ वर्ग सभासद आहेत.परळी सिने-नाट्य कलावंत संघटनेचे सक्रिय सदस्य आहेत.

याचबरोबर, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा डोळस पदाधिकारी म्हणून त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यम क्षेत्रात, ते Tv9 चे प्रतिनिधी संभाजी मुंडे यांच्या समवेत कॅमेरामन आणि दै. महाभारतचे परळी प्रतिनिधी म्हणून पत्रकारितेच्या क्षेत्रात आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे दक्ष वार्ताच्या न्यूज चॅनेलच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांवर परखड भाष्य करणे.

'एक वही, एक पेन': डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा:-

विकास वाघमारे यांच्या व्यक्तिमत्त्वावर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा सखोल प्रभाव आहे. याच प्रेरणेतून, ते विकास रोडे यांच्या समवेत दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एक विशेष आणि अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम राबवतात. हा केवळ एक उपक्रम नसून, ती एक शैक्षणिक व सामाजिक चळवळच आहे – 'एक वही, एक पेन' उपक्रम.

गेली अनेक वर्षे हा उपक्रम परळी शहर आणि आजूबाजूच्या गावांमध्ये सातत्याने आणि अविरतपणे राबवला जात आहे. आजही वंचित, उपेक्षित आणि अनाथ मुलांना शिक्षण घेण्यासाठी 'एक वही आणि एक पेन' मिळवताना आर्थिक अडचण जाणवते. अशा गरजू विद्यार्थ्यांच्या हाती जेव्हा ती अत्यावश्यक वस्तू मिळते, तेव्हा त्या वहीची आणि पेनाची जी किंमत असते, त्याचे मोल कोणत्याही पैशांत करता येत नाही.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पेन आणि लेखणीच्या माध्यमातून क्रांती घडवून या देशाला समताधिष्ठित राज्यघटना दिली. त्यांच्या जयंतीनिमित्त राबवला जाणारा हा उपक्रम म्हणजे बाबासाहेबांनी दिलेल्या आधुनिक भारताच्या शिक्षणाच्या विचारांना खऱ्या अर्थाने कृतिशील अभिवादन आहे. 'समाजाच्या उपयोगी येतील असे उपक्रम जयंतीत राबवायला हवेत,' हा मौल्यवान संदेश विकास वाघमारे यांच्या या कृतीतून दिला गेला आहे.

वाढदिवसाचा आगळा वेगळा सोहळा व अनोखा संकल्प:-

फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील कृतिशील युवा म्हणून विकास वाघमारे यांचे वेगळेपण केवळ उपक्रमांत नाही, तर त्यांच्या वैयक्तिक कृतीतही दिसून येते. इतरांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिखाऊ पुष्पगुच्छ देण्याऐवजी, ते आवर्जून महापुरुष आणि महामातांची प्रेरणादायी पुस्तके भेट देऊन तो वाढदिवस साजरा करतात. ही त्यांची अभिनव पद्धत त्यांचे वैचारिक अधिष्ठान आणि प्रबोधनाची तळमळ स्पष्टपणे दर्शवते.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सक्रिय पदाधिकारी म्हणून ते सर्वपरिचित आहेत. त्यांनी स्मशानभूमीत वृक्षारोपण करून व अल्पोपहार करून लोकांच्या मनात असलेले गैरसमज ,अज्ञान, अंधश्रद्धा दूर व्हावे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आपला वाढदिवस स्मशानभूमीत साजरा केला होता.असे विविध उपक्रम ते सातत्याने राबवित असतात.

सामाजिक भान ठेवून कार्यरत असलेल्या या युवा पत्रकाराच्या, रंगकर्मीच्या आणि सामाजिक कार्यकर्त्याच्या भावी वाटचालीस आणि पुरोगामी संघर्षास जन्मोत्सव निमित्ताने मंगलकामना!

**प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे**
**(सिने-नाट्य अभिनेता, लेखक-दिग्दर्शक)**

















# भारत-अमेरिका व्यापार संबंध : 'रेड लाईन्स' आणि भारताची भूमिका

**डॉ. भारत कऱ्हाड**

भारत आणि अमेरिका हे जगातील सर्वात मोठ्या आणि प्रभावशाली लोकशाही राष्ट्रांपैकी दोन आहेत. दोन्ही देशांमध्ये व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, तंत्रज्ञान, आणि शिक्षण क्षेत्रात प्रगाढ सहकार्य आहे. तरीदेखील, या संबंधांमध्ये काही नाजूक मुद्दे आहेत ज्यावर भारताने आपली ठाम भूमिका कायम ठेवली आहे. या मुद्द्यांना परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी "भारताच्या रेड लाईन्स" असे संबोधले आहे. याचा अर्थ असा की काही बाबतीत भारत कोणत्याही दबावाखाली तडजोड करणार नाही. या लेखात आपण भारत-अमेरिका व्यापार संबंधांतील प्रमुख रेड लाईन्स, त्यामागील कारणमीमांसा, आणि या धोरणाचा भविष्यातील परिणाम यावर सखोल विचार करू.

भारत-अमेरिका व्यापार संबंध गेल्या दोन दशकांत वेगाने बदलले आहेत. 2000 साली भारताचा अमेरिकेशी वार्षिक व्यापार सुमारे 14 अब्ज डॉलर्स इतका होता, तर 2024 पर्यंत तो 200 अब्ज डॉलर्सहून अधिक झाला आहे. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापार भागीदार बनला आहे. परंतु या वाढत्या व्यापारातही काही मूलभूत मतभेद कायम आहेत. अमेरिका भारताकडून अधिक बाजार खुला करण्याची मागणी करत असते, तर भारत स्थानिक उद्योग, शेतकरी, आणि राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी काही क्षेत्रांवर संरक्षणात्मक धोरण ठेवतो. हेच "रेड लाईन्स" आहेत — ज्या भारतासाठी अमान्य किंवा चर्चेसाठी बंद आहेत.

पहिली आणि सर्वात महत्त्वाची रेड लाईन म्हणजे कृषी आणि दुग्ध उद्योगातील संरक्षण. भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशातील 60% लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. जर अमेरिकेच्या कृषी उत्पादनांना भारतात मुक्त प्रवेश मिळाला, तर भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटू शकते. अमेरिकेतील कृषी उत्पादने अत्याधुनिक तंत्रज्ञान, सरकारी सबसिडी, आणि मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे स्वस्त मिळतात. अशा परिस्थितीत भारतीय शेतकरी स्पर्धा करू शकणार नाहीत. त्यामुळे भारत कृषी क्षेत्र खुलं करण्यास विरोध करतो. जयशंकर यांनी स्पष्ट सांगितले आहे की, "भारत आपल्या शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या खर्चावर कोणतेही व्यापारिक करार स्वीकारणार नाही." ही भूमिका भारताच्या स्वावलंबी कृषी अर्थव्यवस्थेचे रक्षण करणारी आहे.

दुसरी रेड लाईन म्हणजे ऊर्जा स्वायत्तता. अमेरिका अनेकदा भारतावर दबाव आणते की रशिया, इराण किंवा इतर प्रतिस्पर्धी देशांकडून तेल किंवा गॅस विकत घेऊ नये. पण भारत यावर ठाम आहे की ऊर्जा खरेदी हा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रश्न आहे. भारताला ज्या देशांकडून स्वस्त आणि स्थिर पुरवठा मिळतो, त्यांच्याशी व्यवहार करण्याचा पूर्ण अधिकार असावा. उदाहरणार्थ, रशियन तेल भारतासाठी मोठा आर्थिक फायदा ठरतो. त्यामुळे भारताने अमेरिकेच्या निर्बंधांनाही न जुमानता रशियन तेल खरेदी सुरु ठेवली. या धोरणामुळे भारताची ऊर्जा स्वायत्तता टिकली आणि देशाच्या आर्थिक वाढीस मदत झाली. जयशंकर यांनी म्हटले होते, "युरोप स्वतःच्या हितासाठी रशियन गॅस खरेदी करतो, मग भारताने आपल्या हितासाठी का करू नये?" हे विधान भारताच्या परराष्ट्र धोरणातील आत्मविश्वासाचे द्योतक आहे.

तिसरी रेड लाईन आहे संवेदनशील क्षेत्रातील परकीय नियंत्रण. अमेरिका वारंवार मागणी करते की भारताने संरक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आणि डेटा व्यवस्थापन या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीवरील निर्बंध कमी करावेत. परंतु भारत याबाबतीत सावध भूमिका घेतो. राष्ट्रीय सुरक्षा, डेटा सार्वभौमत्व, आणि सायबर नियंत्रण या बाबी भारतासाठी अत्यंत संवेदनशील आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकन कंपन्यांना भारतीय नागरिकांचा डेटा अमेरिकन सर्व्हरवर साठवण्याची परवानगी देणे म्हणजे गोपनीयतेचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भारताने डेटा लोकलायझेशनचा आग्रह धरला आहे — म्हणजे भारतीय नागरिकांचा डेटा भारतातच साठवला जावा. या निर्णयावर अमेरिका असमाधानी आहे, परंतु भारताने आपली भूमिका कायम ठेवली आहे.

चौथी रेड लाईन म्हणजे न्यायसंगत आणि परस्पर संतुलित व्यापार धोरण. भारत आणि अमेरिका दोघेही मुक्त व्यापाराचे समर्थक आहेत, पण भारताच्या दृष्टीने तो व्यापार 'समान अटींवर' असावा ही अपेक्षा आहे. जर भारताने आपल्या बाजारात अमेरिकन उत्पादनांना प्रवेश दिला, तर अमेरिकेनेही भारतीय औषधं, सेवा, आणि तंत्रज्ञान क्षेत्राला तशीच मोकळीक द्यायला हवी. अमेरिकेत भारतीय औषध उद्योगावर कडक अटी घालण्यात येतात, तर भारतावर बाजार खुला करण्यासाठी दबाव टाकला जातो. भारताचे मत आहे की हा असमतोल दूर झाल्याशिवाय दीर्घकालीन व्यापार करार शक्य नाही.

पाचवी आणि तुलनेने नवीन रेड लाईन म्हणजे दंडात्मक शुल्क आणि अन्यायकारक टॅरिफ धोरणांचा विरोध. 2018 नंतर अमेरिकेने स्टील, ॲल्युमिनियम, आणि काही कृषी उत्पादनांवर भारतावरील टॅरिफ वाढवले. भारतानेही प्रत्युत्तरादाखल अमेरिकन उत्पादनांवर कर लावले. जयशंकर यांनी स्पष्ट म्हटले आहे की, "टॅरिफ युद्धातून स्थिर व्यापार वाढत नाही, तर अविश्वास वाढतो." त्यामुळे भारताने अमेरिकेशी संवाद ठेवून व्यापारातील मतभेद शांततापूर्ण मार्गाने सोडवण्यावर भर दिला आहे.

या सर्व रेड लाईन्समुळे भारताच्या धोरणात एक समान धागा दिसतो — स्वावलंबन, आत्मसन्मान आणि संतुलित आंतरराष्ट्रीय सहकार्य. भारताला जागतिक व्यापारात सहभाग हवा आहे, पण राष्ट्रीय हिताशी तडजोड करुन नव्हे. भारताचे उद्दिष्ट आहे की प्रत्येक करार 'India First' या तत्त्वावर आधारित असावा. अमेरिकेशी असलेल्या 'iCET' (Initiative on Critical and Emerging Technologies) सारख्या उपक्रमांमुळे दोन्ही देशांमध्ये प्रगत तंत्रज्ञान सहकार्य वाढत आहे, परंतु भारत आपली स्वायत्तता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतो.

भविष्यात भारत-अमेरिका व्यापार संबंध आणखी व्यापक होण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांना परस्परपूरक हितसंबंध आहेत — अमेरिकेला भारत हा विशाल बाजार मिळतो, तर भारताला प्रगत तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच्या संधी मिळतात. मात्र, या वाढत्या सहकार्याचा पाया टिकवायचा असेल तर एकमेकांच्या "रेड लाईन्स" ओळखून त्यांचा सन्मान राखणे आवश्यक आहे. भारताची भूमिका ही केवळ संरक्षणात्मक नाही, तर ती दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याची हमी देणारी आहे.

एकूणच पाहता, भारत-अमेरिका व्यापार संबंध हे आता केवळ आयात-निर्यात व्यवहारांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. ते जागतिक धोरणात्मक भागीदारीचे प्रतीक बनले आहेत. या भागीदारीत भारत आपल्या स्वार्थ, संस्कृती, आणि जनहिताचे रक्षण करत आहे. "रेड लाईन्स" म्हणजे अडथळे नव्हेत, तर त्या भारताच्या आत्मसन्मानाच्या रेषा आहेत — ज्या सांगतात की भारत कोणत्याही दबावाखाली नव्हे, तर स्वतःच्या अटींवर जागतिक मंचावर उभा आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# लोकनेते मुंडे साहेबांचे कार्यकर्ते मा नगराध्यक्ष डॉ अशोक ( अप्पा ) तिडके यांना माजलगावचे नगराध्यक्ष करण्यासाठी भाजपाच्या नेत्यांचे बळ



धारूर ( बाबुराव तिडके )पुढील नगराध्यक्ष पदासाठी माजलगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद ओ बी सी महिला करिता राखीव आहे त्यामुळे माजलगावचा नगराध्यक्ष हा भाजपाचा असला पाहिजे हा विचार भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांसह कार्यकर्त्यांची भावना आहे लोकनेते मुंडे साहेब यांचे निष्ठावंत व भाजपाचे एकनिष्ठ डॉ अशोक ( अप्पा ) तिडके यांनी कोणत्याही पदाची अपेक्षा न करता पहिल्या पासुन भाजपाशी व मुंडे घराण्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत त्यामुळे या एकनिष्ठ व एक वचणी असणारे डॉ अशोक अप्पा तिडके यांच्या पत्नी किंवा आई यांना भाजपा कडुन नगराध्यक्ष पदाची उमेदवारी पक्ष श्रेष्ठी कडुन मिळऊन देऊन नगराध्यक्ष करायचे हा संकल्प माजलगाव शहरातील भाजपाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी अंमलात आणलेला दिसुन येत आहे त्यामुळे या सर्व भाजपाच्या नेत्यांनी डॉ अशोक ( आप्पा ) तिडके यांना जोमाने भाजपा कडून नगराध्यक्ष पदासाठी कामाला लागण्याचे राजकिय बळ मिळत असल्याचे समजत आहे डॉ तिडके हे या अगोदर अडीच वर्षे माजलगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष होते त्यावेळी त्यांनी नगराध्यक्ष म्हणुन म्हणुन माजलगावचा पारदर्शक कारभार केला होता त्यांचे वयक्तिक राजकिय मित्रत्वाचे संबंध सर्वांशी चांगल्या प्रकारे आहेत मंत्री पंकजाताईंचा विश्वास देखिल त्यांच्यावर चांगला आहे स्थानिकला भाजपा नेत्यांचे राजकिय बळ त्यांच्या बाजुने भक्कम आहे त्यामुळे स्थानिक नेत्यांनी नगराध्यक्ष उमेदवारी करीता शिफारस पक्ष श्रेष्ठींकडे केली तर स्थानिकचिच शिफारस पक्ष श्रेष्ठींना मान्य करावी लागते त्यामुळे माजलगावचा नगराध्यक्ष हा भाजपाचाच होईल अशी चर्चा मात्र माजलगाव शहरामध्ये होताना दिसत आहे

# रुई - गावचे आदर्श सरपंच मा श्री मयुर ( शेठ ) आंधळे यांची सरपंच संघटनेच्या उप-अध्यक्षपदी निवड - सर्वत्र अभिनंदन



धारूर ( बाबुराव तिडके )विकास काय असतो हे अंमलात आणुन करून दाखविणारे रुई - पिंपळा या गावचे सरपंच श्री मयुर ( शेठ ) आंधळे उच्च विद्याविभुषित शिक्षण शांत संयमी व सतत नागरिकांच्या संपर्कात राहुन कामे करणारे मयुर शेठ श्रीमंती मोठेपण मि पणा याला बगल देऊन सामान्य जनतेच्या हितासाठी उदयास येणारे वडवणी तालुक्याचे नेते म्हणुन परिचयास कामाच्या माध्यामातून पुढे येत असलेले नेते मा मयुर शेठ आंधळे काका मा आ केशवरावजी आंधळे यांचे पाठबळ आई - वडिलांचा आशिर्वाद आणि थोरा - मोठ्यांचे काम करण्याचे मनोबल हेच शक्ती उर्जा आणि काम करण्याची ताकत देत असल्यामुळे सर्वांना आपलेसे वाटणारे मा मयुर शेठ त्यांच्या सर्वांगिन सामाजिक राजकिय कामाची दखल राज्य सरपंच संघटनेने घेतली व कमी वयामध्ये रुई - गावचे सरपंच ते वडवणी तालुका सरपंच संघटनेचे उप - अध्यक्ष म्हणुन त्यांना तालुक्यावर काम करण्याची संधी मिळाली त्यांच्या माध्यामातुन वडवणी तालुक्यातील सरपंच संघटनेला व ग्रामपंचायत सरपंचाना मा मयुर शेठ आंधळे यांचा विकास कामा करिता फायदा होणार आहे मा मयुर ( शेठ ) आंधळे यांची सरपंच संघटनेच्या उप - अध्यक्ष पदी निवड होताच त्यांना अनेकांनी शुभेच्छा देऊन त्यांचा सन्मान केला .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना 27 हजार प्रति हेक्टरी, बागायती शेतकऱ्यांना 32 हजार 500 हेक्टर मदत दिली जाईल. ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे त्यांना 17 हजार प्रति हेक्टर मदत विम्यातून केली जाणार आहे. राज्य सरकारच्या वतीने 31 हजार 628 कोटी रुपयांचे मदतीचे पॅकेज सरकारकडून दिले आहे. जास्तीत जास्त भरपाईचा पैसा दिवाळीच्या आधी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. दरम्यान, आम्ही तिघांनी बसून या पॅकेजवर चर्चा केली. शेतकऱ्यांवर अभूतपूर्व संकट असल्याने इतर ठिकाणचे चार पैसे कमी केली तरी शेतकऱ्यांना पैसे द्यायचे आहेत. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मुलाचे शिक्षण बाधित होऊ नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यासाठी सीएसआर फंड काही जण द्यायला तयार आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पैसे दिले जातील. अजूनही काही मदतीची गरज असेल तिथे मदत करण्याची तयारी शासनाची आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

---------------------------------

होती. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुमारे 32 हजार कोटीचे पॅकेज जाहीर करुन शेतकऱ्यांना त्यांच्या संकटात मदतीचा हात दिला आहे. आतापर्यंत मदतीचे हे सर्वात मोठे पॅकेज असून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे असे ना. पंकजाताईंनी सांगितले.जालना व बीडमध्ये अतिवृष्टीचा दौरा करत असताना ज्या बाबी निदर्शनास आल्या त्यावरुन ना. पंकजाताई मुंडे यांनी सरकारकडे ज्या मागण्या मांडल्या होत्या त्यात 65 मिलिमीटरची अट शिथील करावी, एनडीआरएफ मधील तीन जनावरांची मर्यादा काढावी, खरडून गेलेल्या जमिनीसाठी देखील हेक्टरी मोठी मदत द्यावी अशी मागणी केली होती. या तीनही मागण्यांची दखल सरकारने या पॅकेज मध्ये घेऊन शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला असे सांगत ना. पंकजाताईंनी मुख्यमंत्री फडणवीस तसेच उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत.

----------------------------------

आज मुंबई येथे मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे ही एक कोटीची मदत सुपूर्द करण्यात आली. पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, मंत्री दादा भुसे, श्रीमती यामिनी पाटील यांच्यासोबत ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील, संचालिका रेखाताई बोत्रे पाटील व संचालक ओमराजे बोत्रे पाटील यांनी मुख्यमंत्री सहायता निधीस रु. 1 कोटींचे योगदान देऊन शेतकऱ्यांच्या संकट काळात मोलाची मदत केली.केजच्या आमदार नमिताताई मुंदडा यांच्या अंबाजोगाई येथील वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने देखील 31 लाख 84 हजार 840/- रुपयाचा धनादेश ना. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मदत मंत्रालयात सुपूर्द करण्यात आली. यावेळी आ. नमिताताई मुंदडा, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, अक्षय मुंदडा आदी उपस्थित होते.

----------------------------------------

यांनी मूक आंदोलन केले.छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात या घटनेचा निषेध करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर ही निदर्शने करण्यात आली. ज्यात त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी रोहित पवार यांनी या घटनेचा निषेध करत आपली भूमिका स्पष्ट केली.काल सरन्यायाधीशांवर जो काही हल्ला झाला त्या हल्ल्याचा आम्ही सर्वजण निषेध करतो. काल मनुवादी प्रवृत्तीच्या एका व्यक्तीने एका वकिलाने सरन्यायाधीशांवर हल्ला केला. तो एक आरएसएसचा कार्यकर्ता आहे. सरन्यायाधीश हे सर्वसामान्य कुटुंबातील आहे. ते मोठ्या कष्टातून वकिल झाले. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित असलेला एक व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाचा प्रमुख बनतो आणि अशाप्रकारच्या व्यक्तीवर मनुवादी प्रवृत्तीचा व्यक्ती बुट टाकत असेल, मारत असेल ते हे लोकशाहीला घातक आहे", असे रोहित पवार म्हणाले."आम्ही या गोष्टीला विरोध करतो. तसेच निषेधही करतो. लोकशाही टिकली पाहिजे, सर्वसामान्यांचा आवाज टिकला पाहिजे, अशी आमच्या सर्वांची भूमिका आहे. पण जातीवादी प्रवृत्तीची लोक मुद्दामून या देशात वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न करत आहे. हे मनुवादी प्रवृत्तीची लोक हळूहळू सर्वोच्च न्यायालयातही आपला कंट्रोल असावा, जेणेकरुन येत्या काळात मनुवाद हा देशात परत एकदा आला पाहिजे, असा काहींचा प्रयत्न आहे. याचा विरोध आम्ही सर्वजण करतो", असेही रोहित पवार यांनी सांगितले

----------------------------------------

समाजासह राज्य सरकारलाही मोठा दिलासा मानला जात आहे. मुंबई हायकोर्टात ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण (Maratha Reservation) देण्याच्या अध्यादेशाला विरोध करणाऱ्या आणि समर्थनार्थ काही याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. उच्च न्यायालयात या याचिकांवर मंगळवारी (ता.7) सुनावणी झाली. यावेळी न्यायालयानं राज्य सरकारला तूर्तास दिलासा दिला आहे.मुंबई हायकोर्टाचा दाखल करण्यात आलेल्या संबंधित याचिकांमध्ये कुणबी जीआरला अंतरिम स्थगिती देण्यास राज्य सरकारचा जीआर बेकायदेशीर असल्याचा तसेच संविधानाचा भंग केल्याचा आरोप करण्यात आला. मात्र,आता मुंबई उच्च न्यायालयानं या याचिकांवरील अंतरिम मागणी नाकारत जीआरची अंमलबजावणी सुरु ठेवण्यास परवानगी दिली आहेमराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील बेमुदत उपोषणानंतर राज्य सरकारने 2 सप्टेंबर 2025 रोजी मराठा-कुणबी आरक्षण अध्यादेश काढला होता. त्यानुसार, मराठवाड्यातील मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदींवर आधारित कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली. त्यासाठी जिल्हा स्तरावर समित्या स्थापन करण्याची प्रक्रिया सुरुही झाली आहे..पण याच सरकारच्या निर्णयाविरोधात 2 सप्टेंबर रोजीच्या अध्यादेशामुळे मराठ्यांना ओबीसी कोट्याचा लाभ मिळेल. त्यामुळे ओबीसी कोट्यातील सध्याचे आरक्षण कमी होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. तसेच इतर मागास प्रवर्गांचे मोठं नुकसान होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली होती. तर सरकारच्या या अध्यादेशामुळे राज्यात आतापर्यंत 7 जणांनी आत्महत्या केल्यानं उच्च न्यायालयातील (High Court) याचिकांवर तातडीनं सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली होती.

---------------------------------

दुपारी 1 ते 3 या कालावधीत ह.भ.प.केशव महाराज घुले यांचे किर्तन व त्यानंतर भोजनाचा कार्यक्रम होणार आहे.किर्तन व भोजन कार्यक्रमास उपस्थित रहाण्याची विनंती फुलचंदराव एडबाजी कराड व कराड परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे.

-------------------------------------

बियाणी हे हसतमुख व अजातशत्रू व्यक्तिमत्व होते. त्यांचे परळीकरांचे जिव्हाळ्याचे नाते होते. असेही ते म्हणाले. याप्रसंगी प्रा. पवन मुंडे, सौ उमाताई समशेट्टे, अडवोकेट जीवनराव देशमुख, सुरज बियाणी, अनंत इंगळे, आदींनी सतीश शेठ बियाणी व दैनिक मराठवाडा साथी विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास प्रसिद्ध व्यापारी विजय सामत, महेश बँकेचे चेअरमन ओमप्रकाश सारडा, प्रसिद्ध व्यापारी रतनशेठ कोठारी,सामाजिक कार्यकर्ते ह-भ-प रामेश्वर महाराज कोकाटे, धनंजय आढाव,अडवोकेट मनोज संकाये, ज्येष्ठ पत्रकार संजय खाकरे, संपादक ज्ञानोबा सुरवसे, संपादक बालकिशन सोनी, संपादक रामप्रसाद गरड, संपादक मोहन व्हावळे, संपादक बालाजी जगतकर, शिवाजीराव बनसोडे, प्रा. डॉक्टर राजकुमार यल्लावाड, प्राध्यापक कोकलगावे , वंदे मातरम चे दिलीप जोशी,पत्रकार प्रकाश चव्हाण, एडवोकेट अरुण पाठक, प्रा.रविंद्र जोशी, अश्विन मोगरकर,अरुण फुंडकर, सचिन स्वामी,चंद्रशेखर फुटके,विठ्ठलराव झिलमेवाड, मातोश्री ऑफसेटचे विठ्ठलराव साबळे, संतोष जुजगर, बालाजी ढगे, राजकुमार कदम, नरसिंग अनलदास, अंकुशराव जठार मामा, दत्तामामा लांडे, पत्रकार पप्पू कुलकर्णी, संपादक दशरथ रोडे, रवी पतंगे, आनंद हडबे ,दीपक वंजारखेडे, मुदस्सीर शेख, आनंद तुपसमुद्रे यांच्यासह संपादक, पत्रकार शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार धनंजय अरबुने यांनी केले. प्रास्ताविक पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य व्यवस्थापक ओमप्रकाश बुरांडे,पत्रकार भगवान साकसमुद्रे, पत्रकार अनिल गायकवाड, संपादक नितीन ढाकणे, आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सांगता सतीश शेठ बियाणी यांना दोन मिनिटं स्तब्ध राहून आदरांजली वाहून करण्यात आली.

-----------------------------------------

अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. परंतु, सध्या अंबाजोगाईच्या राजकारणात दोन प्रमुख पक्ष आणि दोन नेत्यांमध्ये तुल्यबळ लढत होण्याची चिन्हे दिसत आहेत:

भारतीय जनता पक्षाकडून (भाजप): युवा नेते आणि पनगेश्वर कारखान्याचे चेअरमन अक्षय भैय्या मुंदडा यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) कडून: माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे प्रबळ दावेदार म्हणून रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.

याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), काँग्रेस आय, वंचित बहुजन आघाडी, एमआयएम, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना (शिंदे गट) आणि रिपाई या पक्षांचे उमेदवारही निवडणुकीच्या मैदानात उतरतील.

अक्षय मुंदडा यांच्या नावाची चर्चा

अध्यक्षपद खुल्या प्रवर्गाला सुटल्याची अधिकृत माहिती मिळताच, भाजपच्या तरुण फळीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अक्षय मुंदडा यांच्या नावासाठी सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरु झाली. "अक्षय भैय्या फिक्स, लागा कामाला" असा ट्रेंड चालवण्यात आल्यामुळे त्यांचे नाव अध्यक्षपदाच्या शर्यतीत सर्वात पुढे आले आहे.

युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे नवयुवकांमध्ये मोठा उत्साह संचारला आहे. सध्या शहरात "आपला माणूस कामाचा माणूस, आपला भैय्या अक्षय भैय्या" हा ट्रेंड जोर धरत आहे.

जमेच्या बाजूअक्षय मुंदडा यांच्याकडे अनेक जमेच्या बाजू आहेत, ज्यांचा अंबाजोगाईकर विचार करतील:वारसा आणि पाठबळ: स्व. विमलताई मुंदडा यांची पुण्याई आणि ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा व आमदार सौ. नमिता मुंदडा यांची खंबीर साथ त्यांना मिळणार आहे.

तरुणांचे समर्थन: त्यांना शहरातील तरुणांचे भक्कम पाठबळ लाभले आहे.

विकासकामांचा आधार: त्यांनी आमदार सौ. नमिता मुंदडा यांच्या विकासनिधीतून कोट्यवधी रुपये खर्च करुन शहराचा केलेला कायापालट ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे.

राजकीय वर्तुळात रंगलेल्या या चर्चेमुळे आणि अक्षय मुंदडा यांच्या "मी येतोय आपल्या सेवेत..." या घोषणेमुळे अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

-----------------------------------

आणि संविधानाला आव्हान देणाऱ्या अशा विकृतावर तत्काळ देशद्रोहाचा कठोर गुन्हा दाखल झाला पाहिजे. राकेश किशोर हा संघाशी संबंधित असल्याची माहिती समोर येत असल्याने संघाचीही बदनामी होत आहे, त्यामुळं संघानेही यावर तत्काळ खुलासा करावा."हा एक व्यक्तिगत हल्ला नसून, ही एक विषारी विचारधारा आहे, या विषारी विचारधारेला आपण थांबवलंच पाहिजे", असं मत सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांची बहीण कीर्ती गवई यांनी व्यक्त केलं आहे.

6 ऑक्टोबरला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणासंदर्भात, त्यांच्या आई कमलताई गवई आणि बहीण कीर्ती गवई यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे.

कमलताई गवई म्हणाल्या, " डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला समावेशक अशी घटना म्हणजेच संविधान प्रदान केलं आहे. या संविधानाच्या केंद्रस्थानी लोकांना ठेवून ही घटना बाबासाहेबांनी देशाला सुपूर्द केली आहे."

पुढे त्या म्हणाल्या, "'आपण जगा आणि इतरांनाही जगू द्या' असा या घटनेचा केंद्रबिंदू आहे. परंतु कायदा हातात घेऊन अराजकता माजवण्याचा कोणालाही या देशात अधिकार नाही."

सर्वांनी आपले प्रश्न शांततेने आणि संवैधानिक मार्गाने सोडवून घ्यावेत, असंही कमलाताई गवई यांनी यावेळी म्हटलं आहे.

मनुस्मृती म्हणजे काय हे लोकांना कळावं म्हणून त्यातील काही मोजक्या गोष्टी पुढं येत आहेत. * वर्णव्यवस्थेवर आधारीत जातीव्यवस्था,* स्त्रियांना पुरुषांच्या अधिन ठेवणे,* स्त्रियांना स्वातंत्र्य, शिक्षण आणि निर्णयक्षमतेपासून दूर ठेवणे, * विशिष्ट घटकांनाच शिक्षणाचा अधिकार,* दंड करताना सामाजिक भेदभाव,* समाजात जातीवाद निर्माण करुन उपेक्षित घटकाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवणं,* संपत्तीचं केंद्रीकरण करुन इतर समाजाला त्यापासून वंचित ठेवणं,* संविधानिक मूल्यांना न जुमाननं,* आणि इतर बाबींचा यांच्या डोक्यात विचार असू शकतो? म्हणूनच अशा निच वृत्तीच्या या वकिलाने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याकडे बूट फेकण्याचा प्रयत्न केला याच्यावर खरोखरच देशद्रोहाचा खटला भरुन याला कडक शासन करावे अशा प्रतिक्रिया देशभरामधून उमटत आहेत.

---------------------------------

आरक्षणाची ही चक्राकार पद्धत पूर्ण झाली असल्यानं शून्य आरक्षणाचा नियम आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागू केला होता. आता प्रभाग रचना बदलली असल्याचं सांगताना यापुढची निवडणूक म्हणजेच आगामी निवडणूक ही पहिली निवडणूक समजण्यात येईल, असं शासनानं नव्या नियमात म्हटलं होतं. त्यामुळं या चक्राकार आरक्षणाच्या नियमाला काहीसा ब्रेक लागला होता. आगामी निवडणूक पहिली निवडणूक समजण्यात येणार असल्यानं आधीचे जे प्रभाग आरक्षित होते ते परत आरक्षित होणार होते.

## पान 4 वरुन

सर्वात जास्त अल्प दरात प्रमाणपत्र काढुन दिल्याबद्दल माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी त्यांना यथोचित सत्कार करुन सन्मानित केले.यावेळी चेअरमन श्रीनिवास निपटे,बळीराम महाराज निपटे,सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष ॲड माधव शेंडगे,मा सरपंच लखन महागोविंद,विलास निपटे अदी उपस्थित होते.

------------------------------------------

लातूरचे जिल्हाध्यक्ष प्रो. डॉ. शरद निलंगेकर यांनी मा. कुलगुरु स्वा .रा.ती .म. विद्यापीठ नांदेड यांना विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक प्रो.मंगेश शिंदे यांच्यामार्फत दिले यावेळी संघटनेचे सहसचिव डॉ. मनोहर चपळे कुलकर्णी सर, प्रा. डॉ. उर्मिला धाराशिवे, प्रा. मालपाणी सर, प्रा. षटकार सर, उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या मागणीला विद्यार्थी, शिक्षक, आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. असल्याची माहिती प्रोफेसर डॉक्टर शरण कुमार निलंगेकर यांनी दिली.

--------------------------------------

जुगलकिशोर लोहीया, श्री पाडूरंग सोनी, श्री ओमप्रकाश भूतडा, श्री जुगलकिशोर सारडा, डॉ .जाजु आर बी, श्री किशोर झरकर व श्री बजरंगलाल चांडक, श्री मुरलीथर सारडा, श्री ओमप्रकाश सारडा यांनी केले.

यानंतर ग्रूप मधील 75 वर्षीय जेष्ठ सदस्य श्री पांडुरंगजी सोनी, श्री ओमप्रकाशजी भुतडा, श्री महादेव आप्पा फडकरी, श्री पांडुरंगजी मोदाणी, श्री रामनारायणजी भुतडा आणि श्री द्वारकादासजी सारडा यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आला, तसेच सदस्यांचे पाल्य असलेल्या 10 वी आणि 12 वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्यानंतर प्रमुख पाहूणे इंद्रकुमारजी जैन यांनी "आओ लौट चले बचपन की और" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की जेष्ठ नागरिकांनी नेहमी सकारात्मक राहावे, आपले आहार आणि विहार याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, जेणे करून आपले आरोग्य उत्तम राहील, उपस्थित जालना येथील सिनियर सिटीजन ग्रुप चे अध्यक्ष यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक व संचलन प्रा. बैजुलालजी भंडारी यांनी केले. प्रास्तावीक मध्ये त्यानी माहीती देताना असे सांगीतले की आमच्या ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष श्री पांडुरंगजी सोनी यांचे मार्गदशानुसार ग्रुप तर्फे विविध सामाजिक, शैक्षणिक धाऊन कामे जसे ग्रामीण रुग्णालय परळी येथे स्वच्छता अभियान, पुरग्रस्ताना अर्थीक मदत, कोरोना कालावधीत अन्नधान्य ची मदत, सिंधूताई सपकाळ ट्रस्ट ला मदत, सहलीचे आयोजन अशी विविध उपक्रम पूर्ण केलेले आहेत.अध्यक्षीय समारोप ग्रुपचे अध्यक्ष श्री पांडुरंगजी सोनी यांनी केले. या प्रसंगी ते म्हणाले की ग्रुप च्या सर्व सभासदाच्या सहकार्याने हाती घेतलेले काम यशस्वी होतात. सर्व सदस्या बरोबर फिरताना एकत्रित कुटुंबा सारखा भास नेहमी वाटतं असतो, याचा उल्लेख त्यांनी केला. या कार्यक्रमात ग्रूप चे जेष्ठ सदस्य श्री रामप्रसादजी मोदाणी यांचे सासरे तसेच गणेशपार भागातील जेष्ठ नागरिक बद्रीनारायणजी जाजू यांचे 92 व्या वर्षी निधन झाले होते, त्यांच्या स्मृतीला उजाळा देत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ग्रुपचे कार्य पाहता ग्रुप मध्ये नवीन सदस्य आणखी जोडले जात आहेत, आजच्या या कार्यक्रमात श्री प्रा.डॉ. रामेश्वरजी बांगड आणि श्री भास्करजी चाटे हे दोघे ग्रुप मध्ये सहभागी झाले असल्यामुळे त्यांचेही स्वागत करण्यात आले. कार्यक्रमानंतर आलेल्या सर्व मान्यवराचे, उपस्थीताचे, आभार मानल्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

-----------------------------------------

या वेळी ॲड. मनोज संकाये म्हणाले की, "श्री धनंजय ढोणे यांनी गुन्हेगारीविरोधात केलेल्या कारवाईमुळे संभाजीनगर परिसरात कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. त्यांच्या कार्यामुळे पोलीस दलाचा सन्मान आणि जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमास विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. परळीतील नागरिकांकडून निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या कार्याचे कौतुक होत असून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मित्र मंडळाचे शिरीष सलगरे, शिवा बडे ,बालासाहेब चाटे, संतोष कांबळे, प्रवीण रोडे, देविदास मुंडे ,आधी मित्रमंडळाचे सहकारी उपस्थित होते

-----------------------------------

सकाळीच संपूर्ण शाळेच्या प्रांगणात उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते. लहान मुलांपासून मोठ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वजण आपापल्या स्पर्धांसाठी सज्ज झाले होते. इयत्ता चौथी ते सातवी या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. माझी शाळा,पर्यावरणाचे महत्त्व, माझा आवडता सण, गुरुजनांविषयी कृतज्ञता, मोबाईल शाप की वरदान, ओला दुष्काळ अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांचे मनमोहक सादरीकरण केले. लहान वयातही विद्यार्थ्यांनी घेतलेला आत्मविश्वासपूर्ण उभा राहण्याची कला, स्पष्ट उच्चार, योग्य हातवारे आणि उत्कृष्ट सादरीकरण पाहून उपस्थित शिक्षक व विद्यार्थी भारावून गेले. प्रत्येक वक्त्याच्या बोलण्यात स्वतःची ओळख आणि विचारशीलतेचे दर्शन घडले.विद्यार्थ्यांच्या या कलागुणांचे कौतुक करताना परीक्षकांनी त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला दाद दिली.

दुसरीकडे इयत्ता बालवाडी ते तिसरी या छोट्या गोजिऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिलेबी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. छोट्या मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस हसू, जिलेबी पकडण्याचा प्रयत्न करताना पडणाऱ्या गंमतीशीर हालचालींनी संपूर्ण परिसर हास्याने दुमदुमून गेला. कुणाच्या हातात जिलेबी आधी आली, कुणाच्या ओठांवर हसू आधी फुलले – हे पाहण्यातच सर्व उपस्थित रमून गेले. हा उपक्रम मुलांच्या चपळतेचा आणि आनंदी वृत्तीचा सुंदर संगम ठरला.

यानंतर सचिव श्री दीपक तांदळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करताना सांगितले, "वक्तृत्व ही विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाची गुरुकिल्ली आहे. विचार मांडण्याची क्षमता विद्यार्थ्यांना नेहमी पुढे घेऊन जाते. खेळ, स्पर्धा, आणि सांस्कृतिक उपक्रम यांच्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो. ज्ञानकुंभ सप्ताहाचा हेतू हाच प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये लपलेले कौशल्य उलगडून, आनंददायी शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उत्कर्ष घडवणे." त्यांनी पुढे सांगितले की, "खेळ हा केवळ मनोरंजन नसून, तो जीवनातील एक शिस्त आणि संघर्षाचे प्रतीक आहे.विद्यार्थी खेळातून शिकतो, खेळातून जिंकतो आणि खेळातूनच खरा आनंद मिळवतो." या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवचैतन्य झळकले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीम. गोपानपाळे मॅडम यांनी तर आभारप्रदर्शन श्री. शेप सर यांनी केले.संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

ज्ञानकुंभ सप्ताहातील प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक नवा अध्याय लिहीत आहे, आणि या उपक्रमांच्या माध्यमातून संस्कार प्राथमिक शाळा आपल्या नावाप्रमाणेच संस्कार आणि ज्ञानाचा सुंदर संगम घडवत आहे.

-----------------------------------------

झाली मोठी रक्कम

आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तू न स्वीकारता, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत योगदान देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत ठेवलेल्या इच्छादानपेटीतून एकूण 32,84,840 रुपये इतकी मोठी रक्कम जमा झाली.

जमा झालेली ही रक्कम दोन स्वतंत्र धनादेशांच्या स्वरूपात मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात आली. यातील एक धनादेश 31,84,840 रुपये रकमेचा होता, तर दुसरा स्वतंत्र धनादेश 1,00,000 रुपये रकमेचा होता.

या समाजोपयोगी कार्याप्रसंगी आमदार नमिताताई मुंदडा, आदरणीय नंदकिशोरजी काकाजी मुंदडा आणि अक्षय भैय्या मुंदडा हे उपस्थित होते. 'काकाजीं'च्या वाढदिवसानिमित्त करण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमामुळे शेतकऱ्यांसाठी मदतीचा मोठा हातभार लागणार आहे.

-----------------------------------

समाजाचे नेते दत्तात्रय माने पाटील,ओबीसी समाजाचे नेते प्रा.वैजेनाथ शिंदे,परीट समाजाचे युवा नेते संघर्ष राऊत,कृष्णा जाधव, भैय्यासाहेब माने,भरत माने,नंदकिशोर देवकुळे,तात्या माने,सोमनाथ पाटस्कर,अजित जाधव,हनुमंत लोकरे,तात्या झेंडे,बाबासाहेब आडे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

--------------------------------------

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेशराव आडसकर आणि भारतीय जनता पक्ष (BJP) यांच्या ताब्यात आहे.केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने ही मदत देताना सभापती अंकुशराव इंगळे, उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर, आणि भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार हे उपस्थित होते.

या कृतीतून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने गरजूंना मदत करण्याच्यादृष्टीने मानवतेचा आणि एकजुटीचा आदर्श केज कृषी उत्पन्न बाजार समितीने घालून दिला आहे. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

---------------------------------------

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालया चे प्राचार्य आबासाहेब हंगे, उपप्राचार्य घुमरे सर होते

समुपदेशक श्री शरद चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार हा कार्यक्रम महाविद्यालयासाठी खास करून का आयोजित केले जातात याबाबतीत माहिती दिली यावेळी विद्यार्थ्यांचे मानसिक,शारीरिक आरोग्य तसेच एचआयव्ही/ एड्स बद्दल मूलभूत माहिती कारणे लक्षणे प्रतिबंधात्मक उपाय कलंक व भेदभाव , 1097 टोल फ्री क्रमांक, 2017 चा कायदा इत्यादी बाबत विस्तृत माहिती दिली एड्स संदर्भात असणारे गैरसमज दूर करून त्याबद्दल शास्त्रीय माहिती घेण्याचे आव्हान त्यांनी केले तसेच आयसीटीसी सेंटरची कार्यप्रणाली याबद्दल माहिती देण्यात आली, एच आय व्ही/ एड्स संदर्भातील माहिती पुस्तकांचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी विद्यार्थिनी मिळून 70 जन उपस्थित होते

---------------------------------------

प्रसाद धस, गुणवंत कामगार कुलदीप सावंत, कामगार अधिकारी बनेश्वर सरडे, सुरज ऊंदरे आदि मान्यवरांच्या हस्ते झाले.

भजन स्पर्धेचा अंतिम निकाल उत्कृष्ट वादक:प्रथम क्रमांक हनुमंत जगदाळे,कळबद्वितीय क्रमांक उमेशपतंगे उदगीर. तृतीय क्रमांकस्वप्निल शेटे अंबाजोगाई. उत्कृष्ट गायक: प्रथम क्रमांक घोडके अविनाश परळी. द्वितीय क्रमांक महादेव पवार. लातूर. तृतीय क्रमांक न्यानोबा व्यवहारे अंबाजोगाई. उत्कृष्ट पेटीवादक: प्रथम क्रमांक ऋतुराज पुरी निलंगा. द्वितीय क्रमांक श्रीमंत मुंडे परळी तृतीयक्रमांक तुकाराम कुंभार धाराशिव. उत्कृष्ट तालसंच: प्रथम क्रमांक कामगार कल्याण केंद्र निलंगा. द्वितीय क्रमांक कामगार कल्याण भवन धाराशिव. तृतीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र बीड.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केंद्र संचालक संगमेश्वर जिरगे यांनी केले तर आभार केंद्र संचालक आरेफ शेख यांनी मानले.

----------------------------------------

गुणसंपन्न बणून ध्येय निश्चितिने उच्च पद प्राप्त करुन स्व:उन्नती बरोबरच समाजसेवा, देशसेवा करावी. शिक्षण म्हणजे आपणास जे अवगत नाही ते लक्षपूर्वक समजून घेणे होय. शिक्षणा शिवाय पर्याय नाही. मूलं हीच आपल्या खरी संपत्ती आहे. तेव्हा पालकांनी लहानपणापासून आपल्या पाल्यावर स्वतः प्रज्ञा शील करुणा व सदाचाराच्या मार्गाने आदर्श जीवन जगावे म्हणजे मुलांवर सुसंस्कार होतील कारण लहान लहान बालके मोठ्याच्या वागण्यामधून अनुकरण करीत असतात तरी पालकांनी आपल्या वर्तणुकीतून मुलासमोर आदर्श ठेवावा असे से.नी. सी.ई.ओ(जी.प ) पी. व्ही बनसोडे कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी मोलाचे मार्गदर्शन अत्यंत सोप्या भाषेत मुलांना समजावून सांगितले.

महामानव अभिवादन ग्रुप संचलित 4 थ्या मोफत शिकवणी वर्गाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे जिल्हा प्रबंधक एल.आय. सी यु.एस वाघमारे व एस.एस सोनवणे यांच्या हस्ते आम्रपाली बुद्ध विहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर (पूरग्रस्त कॉलनी )येथे यांच्या हस्ते संपन्न झाल्या प्रसंगी कार्यक्रमास महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले सर, समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ, प्रशांतजी वासनिक, समाजसेवक बप्पा जावळे के.एस वाघमारे यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपाध्यक्ष प्रा. अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एम राऊत यांनी केले याप्रसंगी प्रशांत वासनिक यांनी स्पष्ट केले की कोळशाच्या खाणीत अत्यंत खोल भागात मौल्यवान हिरा असतो. त्याला प्राप्त करण्याकरिता खूप कष्ट करावे लागतात तसेच उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांनी केलेले कस्ट व त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अठरा-अठरा तास सातत्याने अभ्यास केला तर मिळालेल्या ज्ञानाच्या जोरावर व सदवर्तनाने उच्च पद मिळवून स्व:उन्नती बरोबरच आपल्या आई-वडिलांची सेवा करु शकाल हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले.

कॅप्टन आठवले मुलांशी हित गुज साधताना म्हणाले की आपल्या देशातील एक अंध मुलगी असून खडतर कस्ट व ज्ञानाच्या जोरावर कलेक्टर होऊ शकते, तुम्ही तर धडधाकट आहात, तुम्हीदेखील मोठे होऊ शकता अशी प्रेरणादायक घटना सांगितली.

मोफत शिकवणी वर्गाच्या शिक्षिका रिंकल टेकाळे ताई,आयु रेखा गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते मोफत शिकवणी वर्गांना लागणारे साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

06 डिसेंबर 2024 रोजी मिळालेल्या दान साहित्यातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य( वही पेन) व खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन," वाचाल तर वाचाल" चे अध्यक्ष डी.जी.वानखेडे यांनी व्यक्त मोफत शिकवणी वर्गा करता व नियमित व भरघोस दान देणाऱ्या सर्व दानदात्याचे मनापासून आभार व्यक्त करून येथून पुढे देखील सहकार्य करावे अशी विनंती केली. कार्यक्रमास परिसरातील सीताबाई वडमारे,इंदुबाई वडमारे, कांताबाई वडमारे, कस्तुराबाई गायकवाड,रवींद्र टेकाळे,भाऊराव वडमारे,माजी सरपंच माळापुरी महादेव डोईफोडे,व बहूसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनींची व पालकांची उपस्थिती होती.

-------------------------------------




# आ प्रकाश सोळंके यांनी केला राम निपटेंचा सत्कार



वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी मोठे मोलाचे योगदान ठरलेले श्रावणी झेरॉक्सचे राम निपटे यांचा माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी यथोचित सत्कार केला.

सविस्तर वृत्त असे की तालुक्यात फिरते श्रावणी झेरॉक्स सेंटरच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक गावा गावात वाडी वस्त्यावर जाऊन राम निपटे यांनी कुणबी नोंदी आणि कुणबी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी केली.ज्यांचे कुणबी यादीमध्ये नाव आहे.त्यांची संपूर्ण वंशावळ जुळवून देण्यासाठी लागणारे शासकीय कागदपत्रे स्वतः मेहनत घेऊन कुणबी प्रमाणपत्र काढण्यास मोठे सहकार्य केले. तालुक्यातून पान 3 वर

# विक्रम चहाचे संस्थापक रमेशभाई पटेल (भाईश्री) यांचा वाढदिवस साजरा



परळी (प्रतिनिधी) _ विक्रम चहाचे संस्थापक रमेशभाई पटेल (भाईश्री) यांच्या 76 व्या वाढदिवसानिमित्त दि. 7 ऑक्टोबर 2025 रोजी घाटनादूर येथील गुरुदास सेवा आश्रम (वृद्धाश्रम) येथे 76 ब्लँकेट वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. दूरदृष्टी, कष्टशील वृत्ती आणि सेवाभावामुळे आज विक्रम चहा घराघरात पोहोचला आहे.

आपले संपूर्ण जीवन हे अनेकांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरले आहे असे उदगार यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. सदरील ब्लँकेट वाटप कार्यक्रम लालाजी महाराज आणि प्रभाकर हजारे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी संतोष खेडकर, गोपाळ कंकाळ, विरभद्र जवादे उपस्थित होते.कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन विक्रम चहाचे वितरक संजय सेवलकर यांनी केले.




# अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे.

**➲ ए. बी. आर. एस. एम. संघटनेची मागणी**



नांदेड ;-मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व उद्रवलेल्या पूरस्थितीमुळे दैनंदिन जीवनातील गरजा भागविणे नागरिकांना अवघड झालेले आहे अशा परिस्थितीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर परीक्षेचे हजाराच्या घरात परीक्षा शुल्क भरणे अशक्य झालेले आहे. अशा परिस्थितीत त्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे. अशी मागणी मागणी निवेदनाच्या माध्यमातून अखिल भारतीय शैक्षिक महासंघ पान 3 वर

# महेश सिनियर सिटीजन ग्रुप च्या वतीने 75 वर्षीय जेष्ठ सदस्यांचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न.



परळी (प्रतिनिधी) –दि. 01 ऑक्टोबर 2025 "जागतिक जेष्ठ दिनाचे" औचित्य साधून रविवार दि. 5 ऑक्टोबर 2025 रोजी ग्रुप मधील 75 वर्षीय जेष्ठ सदस्यांचा आणि सदस्यांचे पाल्य असलेल्या 10 वी आणि 12 वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम ग्रूप चे अध्यक्ष श्री पांडुरंगजी सोनी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी, प्रमुख पाहुणे म्हणून श्री इंद्रकुमारजी जैन (जालना), उपस्थित होते. तसेच श्री महेन्द्रकुमारजी गुप्ता, श्री रामदेवजी क्षोत्रीय, श्री आशोकजी मिश्रा, श्री आशोकजी हुरगट, श्रीरमेशचंद्रजी सोनी यांची उपस्थीती उल्लेखनिय होती. कार्यक्रमाची सुरुवात रामायणातील सुंदरकांड पठणाने करण्यात आली.

त्यानंतर प्रमुख पाहुणे आणि इतर पाहुण्यांचा परिचय जालना निवासी श्री अशोकजी हुरगट यांनी करून दिला. उपस्थित पाहुण्यांचा सत्कार ग्रूपच्या वतीने जालना येथील सर्व पाहुण्यांचे स्वागत शाल, पुष्पगुछ व मानचिन्ह देऊन श्री पान 3 वर

# "उत्कृष्ट कार्यामुळे पोलीस दलाचा सन्मान वाढविला"-ॲड. मनोज संकाये

**संभाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक धनंजय ढोणे यांचा परळीत सत्कार**



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) –संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री धनंजय ढोणे यांनी गेल्या काही महिन्यांत गुन्हेगारीविरोधात केलेल्या प्रभावी कारवाईमुळे कायदा-सुव्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक श्री नवनीत कंवत (भा. पो.से.) यांनी प्रशस्तिपत्र देऊन दखल घेत गौरव केला, ही परळीकरांसाठी अभिमानाची बाब आहे.

या कार्याच्या पार्श्वभूमीवर परळी येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये मित्र परिवाराच्या वतीने श्री धनंजय ढोणे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

हा कार्यक्रम मंगळवार, दिनांक 7 ऑक्टोबर 2025 रोजी परळी शहरात पार पडला.

पान 3 वर

# विद्यार्थ्यांमध्ये असलेले कौशल्य उलगडून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उत्कर्ष घडवणे हा ज्ञानकुंभ सप्ताहाचा उद्देश – श्री. दीपक तांदळे

**➲ ज्ञानकुंभ सप्ताहाच्या पाचव्या दिवशी वक्तृत्व स्पर्धा आणि जिलेबी स्पर्धेचे यशस्वी आयोजन**



परळी (प्रतिनिधी) – शिक्षणमहर्षी, परळी भूषण तथा आदर्श शिक्षक कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ज्ञानकुंभ सप्ताहाचा पाचवा दिवस श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा (पद्मावती व विद्यानगर विभाग) येथे उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. ज्ञानकुंभ सप्ताहातील प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांच्या कौशल्य, सृजनशीलता आणि आत्मविश्वासाला नवी दिशा देणारा ठरत असून, आजचा दिवस वक्तृत्व स्पर्धा आणि जिलेबी स्पर्धा या दोन अनोख्या व आनंददायी उपक्रमांनी रंगला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री कैलास तांदळे (अध्यक्ष, श्री पद्मावती शिक्षण संस्था) यांनी भूषविले, तर प्रमुख अतिथी म्हणून श्री दीपक तांदळे (सचिव, श्री पद्मावती शिक्षण संस्था) तसेच श्रीमती प्रेमिलाताई तांदळे मॅडम (सहसचिव), श्री. अनकाडे सर (मुख्यकार्यकारी अधिकारी), मुख्याध्यापिका सौ. माधुरीताई तांदळे मॅडम, पर्यवेक्षक श्री इंगळे सर, प्रभारी मुख्याध्यापक श्री गायकवाड सर, तसेच श्री दैठणेकर सर, ज्येष्ठ शिक्षिका रणखांब मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. मान्यवरांच्या हस्ते पुष्पार्पण करून व श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. पान 3 वर

# काकाजीं'च्या वाढदिवसाचं अनोखं दान! मुख्यमंत्री सहाय्यता निधीत 32 लाखांहून अधिक रकमेचा धनादेश सुपूर्द




प्रकाश मुंडे/ केज प्रतिनिधी* :- आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) यांच्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तूंचा स्वीकार न करता, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात पुढे करण्याच्या त्यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या वाढदिवसानिमित्त जमा झालेल्या तब्बल 32,84,840/- रुपये रकमेचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द करण्यात आला आहे.

मुंबई येथील मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी, राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, लोकनेत्या मा.ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची विशेष उपस्थिती होती.

'इच्छादानपेटी'तून जमा पान 3 वर

# आद्य कवि महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी



वडवणी (प्रतिनीधी) प्रतिवर्षी प्रमाणे महर्षी वाल्मिकी ऋषि यांच्या जयंतीनिमित्त वडवणी शहरामध्ये विविध कर्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते आदीवासी महादेव कोळी समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या जयंतीचे देशातील महान संत म्हणून व देशातील लोकांना रामायणाच्या माध्यमातून धार्मिक अधिष्ठान मिळून देण्याचे काम त्यांनी केले आहे.परंतु आज ही महर्षी वाल्मिकी समाजाचे विविध प्रश्न त्याचा न्याय समाजाला मिळत नाही संघर्षाची वेळ समाजावर आली आहे. सरकारने आमचे प्रश्न तात्काळ सोडले पाहिजेत व घटनेचे कलम 340,341,342 हे कलमे कायम ठेवून गावा गावात निर्माण झालेले वाद प्रेमाने संपुष्टात आणण्यासाठी सर्व समाजाने एकत्र येऊन चांगला संदेश दिला पाहिजे देश एकसंघ झाला पाहिजे आशा भावना व्यक्त करण्यात आल्या .

समाजाने आपल्या प्रश्नासाठी आंदोलन करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. असे मत मान्यवरांनी व्यक्त केले यावेळी महादेव कोळी पान 3 वर

# अतिवृष्टीग्रस्तांना केज कृषी उत्पन्न बाजार समितीचा मदतीचा हात



प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे (Heavy Rainfall) पूर आणि नैसर्गिक आपत्तीने नुकसान झालेल्या आपद्ग्रस्तांना मदतीचा हात म्हणून केज कृषी उत्पन्न बाजार समितीने (APMC, Kaij) एक महत्त्वाचा आणि स्तुत्य निर्णय घेतला आहे.

बाजार समितीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला (Chief Minister's Assistance Fund) एक लाख (एक लक्ष) रुपयांचा धनादेश सुपूर्द केला आहे. विशेष म्हणजे, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा मदतीचा धनादेश त्यांच्याकडे देण्यात आला. केज बाजार समितीने दाखवलेल्या या सामाजिक बांधिलकीबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.सध्या केज कृषी उत्पन्न बाजार समिती पान 3 वर

# नवगण महाविद्यालयात एच आय व्ही/ एड्स जनजागृती शिबिर संपन्न!




परळी (प्रतिनिधी) – आय इ सी कॅम्पेन अंतर्गत वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै. यांच्या वतीने नवगण महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे एचआयव्ही/एड्स जनजागृती शिबिर सकाळी 10 वाजता आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे प्राध्यापक सर यांनी केले या पान 3 वर

# भजन स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र निलंगा प्रथम

**» परळीच्या भजनी संघाला दोन बक्षीसे तर बीडच्या संघाला तालसंचलनासाठी तृतीय बक्षीस**



परळी (प्रतिनिधी) : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने पुरुष कामगारांसाठी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र निलंगाच्या संघाला प्रथम पारितोषिक मिळाले तर द्वितीय क्रमांक कामगार कल्याण भवन धाराशिव, तृतीय क्रमांक कामगार कल्याण भवन लातूर या संघांनी पटकाविले.या स्पर्धा कामगार कल्याण भवन धाराशिव येथे सोमवारी संपन्न झाल्या. स्पर्धेचे पारितोषिक वितरण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै. पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी धनंजय रणदिवे, आगार व्यवस्थापक बालाजी भांगे, कामगार कल्याण अधिकारी पान 3 वर

# कणा-कणाने ज्ञान मिळवून शील सदाचाराने वागून कर्तुत्ववान बना-पी व्ही बनसोडे

**( महामानव अभिवादन ग्रुपच्या 4 थ्या मोफत शिकवणी वर्गाचे उदघाटन संपन्न )**



बीड (प्रतिनिधी ) मधमाशा कणा-कणाने निसर्गातील विविध फुलांमधील मध गोळा करतात व मधाच्या पोळ्यात साठवतात. त्या मधाचा उपयोग आपण मानव करतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत क्षणही वाया न जाऊ देता कणा-कणाने आपल्या पाल्याकडून, गुरुजनाकडून, निसर्गाकडून व पुस्तकाच्या सहवासात राहून ज्ञान प्राप्त करावे व त्याला शील सदाचाराची जोड देऊन भारतरत्न बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सर्वच आदर्श महापुरुष व राष्ट्रमाता जिजाऊ व सर्वच महामातांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अनिष्ट रुढी परंपरा व अंधश्रद्धेच्या आहारी न जाता ज्ञानसंपन्न व पान 3 वर